लोकमत

# विद्यापीठ परीक्षांना आजपासून प्रारंभ

## पहिल्या टप्प्यात ४० अभ्यासक्रम : ऑफलाईन एमसीक्यू स्वरूप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाकडून उन्हाळी सत्रातील पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विविध स्वरुपातील ऑफलाईन एमसीक्यू (बहुपर्यायी प्रश्नावली) परीक्षा आज मंगळवारपासून होणार आहेत. त्यात पहिल्या टप्प्यातील विविध ४० अभ्यासक्रमांच्या परीक्षा होतील.

पहिल्या टप्प्यात मंगळवारी बीएस्सी. आयटी., बायोटेक, शुगरटेक, बीसीएस, बीआयडी, बी. कॉम आयटी, मॅनेजमेंट, बी. व्होक आदी ४० अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू होतील.

### भरारी पथकांची राहणार नजर

या परीक्षेतील गैरप्रकार (कॉपी) टाळण्यासाठी परीक्षा मंडळाकडून कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यासाठी प्रत्येकी एक भरारी पथक तैनात राहणार आहे. या पथकाची संबंधित जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांवर नजर राहणार आहे.

उन्हाळी सत्रात होणाऱ्या परीक्षा ५६१ | परीक्षार्थींची संख्या ०२ लाख

त्यासाठी सुमारे ५० हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. विधी, अभियांत्रिकी, फार्मसी अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या ५२१ परीक्षा दि. २५ जुलैपासून सुरू होतील. त्यासाठी दीड लाख परीक्षार्थी आहेत. या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने (प्रत्यक्ष परीक्षा केंद्रावर हजर राहून) ५० गुणांची संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित (प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण २५ प्रश्न प्रत्येकी २ गुण) परीक्षा एक तास कालावधीची एमसीक्यू पद्धतीने होणार आहे.

पुढारी

# विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर परीक्षांना आजपासून प्रारंभ

## ७८ परीक्षांचा समावेश; दीड लाखांवर विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्रातील विद्यापीठ स्तरावरील ५६१ पैकी ७८ परीक्षांना मंगळवार (दि. १९) पासून प्रारंभ होणार आहे. परीक्षेला १ लाख ४७ हजार ८०६ विद्यार्थी बसणार आहेत. परीक्षेची सर्व तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

विद्यापीठ विद्या परिषदेच्या मान्यतेनुसार सर्व ७४१ परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने घेण्यात येणार आहेत. परीक्षा वेळापत्रक व हॉल तिकीट विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहेत. १९ जुलैपासून पहिल्या टप्प्यातील बीएस्सी व बीएच्या अंतर्गत येणारे ७८ अभ्यासक्रमांच्या परीक्षांना सुरुवात होणार आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील



२७६ महाविद्यालयांना 'एसआरपीडी' मोडद्वारे परीक्षेसाठीच्या 'ओएमआर' शीट पाठविल्या आहेत. अंतर्गत व बाह्य परीक्षकांची नेमणूक केली आहे. जिल्हानिहाय पर्यवेक्षकांची नियुक्ती केली आहे. परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष नोंद करून परीक्षा प्रमाद समितीच्या वतीने नियमानुसार कारवाई केली जाणार आहे. नियमित बीए, एमए, एमएस्सीसह बी. फार्मसी, इंजिनिअरिंगच्या परीक्षा २५ जुलैपासून सुरू होणार आहेत.

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या परीक्षा आजपासून

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्राच्या एकूण ७४१ अभ्यासक्रमाच्या परीक्षांपैकी विद्यापीठस्तरावरील ५६१ परीक्षांपैकी ७८ परीक्षांना मंगळवारपासून प्रारंभ होत आहे. या परीक्षांना एमसीक्यू ऑफलाईन पद्धतीने सुरुवात होणार आहे. एकूण १ लाख ४७ हजार ८०६ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

परीक्षा सुरळीत व निर्विघ्नपणे पार पडाव्यात यासाठी विद्यापीठ परीक्षा विभागाने तयारी केली आहे. परीक्षांची वेळापत्रके तसेच प्रवेशपत्रे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहेत.

विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. पथकाकडून परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर गैरप्रकार म्हणून प्रत्यक्ष नोंद करून परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई विद्यापीठामार्फत करण्यात येणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव यांनी दिली.

तरुण भारत

# विद्यापीठ ऑफलाईन वस्तुनिष्ठ परीक्षा आजपासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी ऑफलाईन वस्तुनिष्ठ ५६१ परीक्षांपैकी ७८ परीक्षांना आजपासून (दि. १९) सुरूवात होणार आहे. ७४१ विषयांसाठी १ लाख ४७ हजार ८०६ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. या परीक्षांची विद्यापीठ प्रशासनाने तयारी केली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव यांनी दिली.

पदव्युत्तर व पदवी स्तरावरील परीक्षा ओएमआर शीटवर होणार आहेत. परीक्षा ऑफलाईन पध्दतीने (प्रत्यक्ष परीक्षा केंद्रावर हजर राहून) ५० गुणांची संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित (प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण २५ प्रश्न, प्रत्येकी २ गुण) आहे. परीक्षेचा वेळ एक तासाचा असून बहुपर्यायी प्रश्नावली (एमसीक्यू) पध्दतीने होणार आहे. या परीक्षांसाठी ज्यादाची वेळ, दोन पेपरमध्ये अंतर इत्यादी बाबींची मुभा असणार नाही. परीक्षांमध्ये गैरप्रकार होवू नयेत म्हणून भरारी पथकांची स्थापना केली आहे. गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियमानुसार कारवाई केली जाईल, असा इशारा भरारी पथकाने दिला आहे. परीक्षेसंदर्भात विद्यापीठाने दिलेल्या सुचनांचे पालन विद्यार्थ्यांनी करावे, असे आवाहन डॉ. जाधव यांनी केले आहे.



- **७४१ विषयांसाठी १ लाख ४७ हजार ८०६ विद्यार्थी परीक्षा देणार**